नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 06/03/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## पोस्टे सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा येथे अवैधरित्या दारू अड्यावर धाड
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 06.03.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, पोस्टे सावनेर हद्दीत मौजा धापेवाडा येथे एक इसम अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्री करीत आहे. या खबरेवरून मौजा धापेवाडा वार्ड क्र. 4 येथे राहणारा इसम नामे क्रिष्णा वसंता धार्मीक यांचे घराजवळ गेले असता, तो पोलीसांना पाहुन पडुन गेला. त्याचे घराच्या समोर खाली जागेतील टीनाच्या खाली देशी दारू च्या 117 निपा व विदेशी दारू च्या 13 निपा असा एकुण 10,790/– रू चा माल मिळुन आला. आरोपीतांविरूध्द पोस्टे सावनेर येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता आरोपी व मुद्देमाल पोस्टे सावनेर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, नापोशि राजेंद्र रेवतकर, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, महिला पोलीस नायक नम्रता बघेल यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर